# विद्यापीठात सायकल रॅली

विद्यापीठात सुरू असलेल्या ज्येष्ठ नागरिक शिबिरा दरम्यान ज्येष्ठ नागरिकांप्रती संवेदना व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यापीठात शुक्रवार दि. १३ ऑक्टोबर रोजी सकाळी सायकल रॅली काढण्यात आली.



आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे दि. १० ते १४ ऑक्टोबर या कालावधीत ज्येष्ठ नागरिक सहायता दुत प्रशिक्षण शिबीर सुरू आहे. शुक्रवारी सकाळी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून ते सिनेट सभागृहापर्यंत सायकल रॅली काढण्यात आली. यावेळी जिल्हा परिवहन अधिकारी श्याम लोही, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी राहुल इंधे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, सिनेट सदस्य ॲड. केतन ढाके, संचालक प्रा. आशुतोष पाटील, योग मार्गदर्शन केंद्राचे प्रमुख राजेश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. रॅलीमध्ये जळगाव शहरातील सायकलपटू कामिनी धांडे, रसिका भोळे, रसिदा चुनावाला, छाया ढोले, डॉ. अनघा चोपडे, आरती व्यास, सुनील चौधरी, राम घोरपडे, सखाराम ठाकरे, राजु मराठे, राजु सोनवणे, रूपेश महाजन, आदर्श पाटील, गोपी महाजन, समीर रोकडे, भुपेश व्यास, सुभाष पवार, डॉ. सुयोग चोपडे, राजेश काळे, अतुल सोनवणे, दिपक पाटील, दिलीप मालुसरे तसेच शिबिरातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थी सहभागी होते.

## सायबर सुरक्षेबाबत जनजागृती



विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील विविध प्रशाळांमध्ये जाऊन सायबर सुरक्षेबाबत जनजागृती केली.

संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्वीक हिल फाउंडेशन यांच्यात सामजंस्य करारान्वये सायबर सुरक्षेबाबत सातत्याने जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात येतात. सध्या सायबर क्राईमच्या घटना वाढल्या आहेत. ऑनलाईन फसवणुकीचे गुन्हे घडत आहेत. या सगळ्याबाबत विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करून कोणती खबरदारी घेतली पाहिजे. याबाबत माहिती देण्यात आली. प्रशाळेचे संचालक डॉ. सतिश कोल्हे, समन्वयक प्रा. राजू आमले, प्रा. सुरेन्द्र कापसे, प्रा. मनोज पाटील, ठकन जानगवळी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी आशिष पाटील, राजश्री कापुरे, पायस सावळे, पौर्णिमा चौधरी, कुणीका खैरनार, दर्शना हिरे, वैष्णवी सांळुके, नेहा पवार, लिना भोंडे, संजना अंदुरकर, गौरव चौधरी, गजानन घुले यांनी विविध प्रशाळांमध्ये जावून सायबर सुरक्षेततेबाबत माहिती दिली.



### पी.एम.मुंदडे माध्यमिक विद्यालयात सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

विद्यापीठाच्या संगणक शास्त्र प्रशाळा व क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पी.एम. मुंदडे माध्यमिक विद्यालय, जळगाव येथील ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षे संदर्भात माहिती देतांना संगणक प्रशाळेतील विद्यार्थी सचिन पाटील व मयुर बंडे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत माहिती दिली. यावेळी जळगाव येथील सायबर क्राईम विभागातील पोलिस कर्मचारी अरविंद वानखडे यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमावेळी शाळेचे मुख्याध्यापक कुमावत सर, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.